# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## पर्यावरण विभाग

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१

ई-मेल : save.environs@mbmc.gov.in


जा.क्र.मनपा/पर्यावरण/ ७०६ /२०२५-२६ दि. २२/०८ /२०२५

**प्रति,**
**सिस्टीम मॅनेजर**
माहिती व तंत्रज्ञान विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- जाहिर आवाहन प्रसिद्धीबाबत.**

उपरोक्त विषयांन्वये आगामी गणेशोत्सव २०२५ व इतर उत्सवांदरम्यान शहरातील ध्वनी प्रदूषणावर नियंत्रणासाठीचे जाहिर आवाहन प्रसिद्ध करण्यात आलेले आहे. (सोबत जाहिर आवाहनाची प्रत जोडलेली आहे.)

तरी सदर जाहिर आवाहन मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

**(योगेश गुण्जिन)**
सहा. आयुक्त (पर्यावरण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**सोबत :-**
जाहिर आवाहन

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## पर्यावरण विभाग

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१

ई-मेल : save.environs@mbmc.gov.in

जा.क्र.मनपा/पर्यावरण/७०६/२०२५-२६ दि. २२/०८/२०२५.

## // जाहीर आवाहन //

### शहरातील ध्वनी प्रदूषणावर नियंत्रणासाठी नागरीकांना आवाहन

माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार महानगरपालिका क्षेत्रातील ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ध्वनी प्रदूषणाचे वाढते प्रमाण आपल्या आरोग्यासाठी तसेच पर्यावरणासाठी घातक ठरू शकते. यासाठी पुढील उपाययोजना आपल्या स्तरावरून कराव्यात.

१. सार्वजनिक आणि खाजगी ठिकाणी ध्वनी पातळी मर्यादित ठेवावी.

२. कोणत्याही प्रकारचे ध्वनिक्षेपक, साउंड सिस्टम किंवा लाऊडस्पीकर मर्यादित आवाजात वापरावा.

३. सण, उत्सव किंवा इतर कार्यक्रमांमध्ये ध्वनी नियमांचे काटेकोर पालन करावे.

४. रात्री १० नंतर ध्वनिक्षेपकांचा वापर टाळावा.

तरी दि.२७/०८/२०२५ रोजीपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात कृपया वरील मार्गदर्शक सूचनांचे तसेच शासनाकडून ध्वनीप्रदूषण नियंत्रणाबाबत वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सूचना व निर्देशांचे पालन करणेबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत सर्व नागरिक तसेच सर्व गणेशोत्सव मंडळांना आवाहन करण्यात येत आहे.

**(कविता बोरकर)**
उप-आयुक्त (पर्यावरण)
मिरा भाईंदर महानगरपालिका